# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/02/2024 (मंगळवार) दुपार


## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक २६/०२/२०२४ चे ०७.३० वा. ते ०९.०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन खापा हद्दीत पो.स्टे खापा येथील स्टाफ पेट्रोलिंग करीत असताना मुखबिरद्वारे मिळालेल्या खबरे वरुन मौजा नागलवाडी शिवार येथे अवैध्यरित्या विनापरवाना रेती लोड करुन वाहुतक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमी वरून मौजा नागलवाडी शिवार येथे नाकाबंदी केली असता एक विना नंबरचा लाल रंगाचा ट्रॅक्टर येतांना दिसल्याने हाताने थांबविण्याचा ईशारा केला असता. ट्रॅक्टर चालकाने पोलीसांना वर्दीत पाहुन आपले ताब्यातील ट्रॅक्टर जागीच सोडुन पळुन गेला. पळुन गेलेला इसम फरार आरोपी नामे – दिपकसिंह उईके रा. नागलवाडी हा चालवित असलेल्या ट्रॅक्टर व ट्रॅक्टरला लागुन असलेली ट्रॉलीची पाहणी केली असता ट्रॉलीमध्ये रेती भरलेली असून यातील फरार आरोपी नामे दिपकसिंह उईके रा.नागलवाडी हा चोरटी रित्या रेती गौण खनिजची वाहतुक करीता वापरात आणलेला एक महिन्द्रा ५७५ DI सरपंच कंपनीचा विना नंबरचा लाल रंगाचा ट्रॅक्टर किं. ५,००,०००/–रूपये व ट्रॉली किं. ७०,०००/–रूपये व एक ब्रॉस रेती किं. ३,०००/–रूपये असा. एकुण किं. ५,७३,०००/–रूपये चा माल जप्त करून ताब्यात घेतला. फरार आरोपी विरूद्ध पोस्टे खापा येथे कलम ३७९ भादंवि सहकलम ४८(८), महाारष्ट्र जमिन महसुल अधिनियम अन्वये पोस्टे खापा येथे गुन्हा नोंद केला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर